



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २०८ * नांदेड * गुरूवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# राज्यात पुन्हा मान्सून सक्रिय!

## पुढील ४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात मान्सूनने पुन्हा जोर धरला असून पुढील चार दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने ६ ते ९ ऑगस्टदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर तसेच काही जिल्ह्यांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विशेषतः उत्तर मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि कोकण-गोवा पट्ट्यात पावसाची तीव्रता अधिक राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



दि. ६ ऑगस्ट रोजी उत्तर मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय कोकण-गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातही अनेक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे डोंगराळ भाग, घाटमार्ग आणि नदीकाठच्या परिसरात विशेष काळजी घेण्याचा सल्ला प्रशासनाने दिला आहे.

दि. ७, ८ व ९ ऑगस्ट रोजी बहुतांश भागात पाऊस असणार आहे. काही ठिकाणी जोरदार सरी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस आणि मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट असण्याचा अंदाज आहे.

हवामान खात्याने मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदी, नाले आणि धबधब्यांच्या परिसरात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. घाटमार्गातून प्रवास करताना सावधगिरी बाळगावी, हवामानाच्या ताज्या अपडेट्सवर लक्ष ठेवावे आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असेही सांगण्यात आले आहे. पावसामुळे काही भागांत पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे तसेच दरड कोसळण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पुढील चार दिवस नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्रात 'ॲनालॉग पनीर'वर वर्षभराची बंदी

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बनावट पनीरच्या विक्रीवर धडक कारवाई करत राज्यात 'ॲनालॉग पनीर'वर (नॉन-डेअरी पनीर) वर्षभरासाठी बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील आदेश अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे.

हा बंदीचा आदेश अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम ३०(२)(अ) अन्वये लागू करण्यात आला आहे. एफडीएच्या नियमांनुसार 'पनीर' हा एक प्रमाणित अन्नपदार्थ असून त्यात दुधातील स्निग्धांश असणे अत्यंत आवश्यक आहे. दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पती तेल, वनस्पती स्निग्धांश किंवा अन्य दुग्धेतर घटकांचा वापर करून तयार केलेले उत्पादन हे कायद्यानुसार 'दुग्ध संदर्भातील ॲनालॉग' ठरते. त्यामुळे अशा उत्पादनाला 'पनीर' नाव देऊन विकणे किंवा ग्राहकांना पुरवणे हा कायद्याने गंभीर गुन्हा मानला जाईल.

# उद्योगासाठी कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांवर फौजदारी गुन्हे दाखल होणार

## उद्योग भवन येथे झालेल्या आढावा बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत यांचे स्पष्ट निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** उद्योग उभारण्यासाठी युवक-युवतींना पाच लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देण्यासाठी बँकांचा नकार असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे ज्या बँकांनी युवक-युवतींच्या कर्जाची फाईल अडवून ठेवली, अशा बँकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे स्पष्ट निर्देश उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिले आहेत.

नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर बुधवारी (दि.५) ते आले असता त्यांनी उद्योग भवनमध्ये आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी वरील निर्देश दिले. याप्रसंगी नांदेड उत्तरचे आ. बालाजी कल्याणकर, दक्षिणचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर, हदगावचे आ. बाबुराव कोहळीकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची व्यासपीठावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत महाराष्ट्रात सर्वच बँकांनी नवीन उद्योग उभारणीसाठी तरूण व तरुणींसाठी कर्ज देण्यासाठी पुढाकार घेत आहेत. मात्र, नांदेडमध्ये महाराष्ट्र ग्रामीण बँकसह बँक



ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया आदी बँका पिछाडीवर आहेत. एसबीआयचे ४३०चे टार्गेट होते परंतु, साडेसात टक्केच पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे ४०० टार्गेट होते. ते ७.२५ टक्के इतकेच झाले असून, बँक ऑफ महाराष्ट्र शून्य आहे. यासंदर्भात मंत्री उदय सामंत यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, त्यांच्याकडे काहीच उत्तर नव्हते. त्यामुळे रागाने मंत्री सामंत यांनी नांदेड जिल्ह्यातील बँका जर कर्ज देण्यासाठी आखडता हात घेत असतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा कडक इशारा दिला आहे.

ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबरनंतर पुन्हा मी आढावा घेणार असून, १०० टक्के काम होत नसल्याचे निदर्शनास आल्यास थेट एफआयार दाखल करणार आहे. कारण, पाच लाख रुपयांचे कर्ज हे कोणाच्या खिशातून जात नाही. ते शासन देणार असतानाही बँकांचे नाटके सुरु आहेत. हे खपवून घेणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, नांदेड जिल्ह्यातील उद्योजकांनी औद्योगिक वसाहतींमध्ये मुलभूत सुविधा मिळत नसल्याचा पाढा वाचला. त्यावर, सर्व अधिकाऱ्यांना उद्योजकांना मुलभूत सुविधा पुरविण्यास कसर केल्यास थेट कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. तसेच ग्रामपंचायत हद्दीत असलेले उद्योजक दोनदा टॅक्स भरत असल्याचा मुद्दा समोर आला होता. त्यावरही त्यांनी फक्त एमआयडीचा टॅक्स भरण्याचे सांगितले आहे.

# गुडघाभर पाण्यात उभे राहून विद्यार्थ्यांची प्रार्थना; उमरा जि.प. शाळेची दुरावस्था

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील उमरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली असून विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी गुडघाभर पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे. एवढेच नव्हे, तर सकाळच्या प्रार्थनेवेळीही विद्यार्थ्यांना पाण्यात उभे राहूनच 'भारत माझा देश आहे' ही प्रतिज्ञा म्हणावी लागत असल्याने पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

उमरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग भरतात.




मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असले, तरी शिक्षण विभाग आणि ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.

शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशन सिरसाट यांनी शाळेतील गळके किचनशेड, पावसामुळे साचणारे पाणी तसेच इतर विविध समस्यांबाबत ग्रामपंचायतीकडे अनेक वेळा लेखी निवेदने देऊन प्रश्न उपस्थित केले. मात्र, संबंधित प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

सध्या शाळेच्या परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला असून पालकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

'डिजिटल इंडिया'च्या युगात विद्यार्थ्यांना अशा परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. शाळेच्या दुरवस्थेकडे शिक्षण विभाग व ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थ आणि पालकांकडून करण्यात येत आहे.

# मराठा आरक्षणाचा पेच वाढला! जीआरनंतर मिळालेले नगरसेवकांचे कुणबी दाखलेच अवैध

**मुंबई (प्रतिनिधी)–** एकीकडे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २९ ऑगस्टपासून पुन्हा एकदा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीसाठी जरागे यांनी आरपारच्या लढाईची घोषणा केली आहे. मात्र, दुसरीकडे, मराठवाड्यातून मराठा आरक्षणाबाबत अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक माहिती समोर आली आहे. जरांगेंच्या तीव्र लढा आणि उपोषणांनंतर शासनाने काढलेल्या अध्यादेशानुसार देण्यात आलेली कुणबी प्रमाणपत्रे आता 'अवैध' ठरू लागल्याने पुन्हा एकदा मोठा पेच निर्माण झाला आहे.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा समाजाने आतापर्यंत तब्बल आठ उपोषणे आणि अनेक भव्य मोर्चे काढले. जरांगेंच्या या आंदोलनांच्या प्रचंड दबावामुळे राज्य सरकारने तातडीने अध्यादेश काढत वंशावळी शोधून हजारो मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्रे वाटप केली होती. यामुळे अनेक कुटुंबांसाठी आरक्षणाचा मार्ग सुकर झाला होता. मात्र, आता याच प्रमाणपत्रांच्या पडताळणीत गंभीर त्रुटी समोर येत आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील ज्योती शिंदे आणि गंगापूर नगरपरिषदेच्या सदस्या वर्षा गायकवाड यांचे कुणबी प्रमाणपत्र अखेर अवैध ठरवण्यात आले आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे संपूर्ण मराठवाड्यात मोठी खळबळ उडाली असून, मिळवलेली प्रमाणपत्रेच अवैध ठरू लागल्याने संपूर्ण आरक्षण प्रक्रियेच्या कायदेशीर वैधतेवरच आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरील आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ आंदोलन

## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी माफी मागावी -आ. चिखलीकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार यांच्याबाबत काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ मंगळवारी आंदोलन करण्यात आले. यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी आपल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी, अन्यथा त्यांना नांदेडमध्ये अथवा राज्यात फिरू देणार नाही, असा इशारा दिला.

काँग्रेस पक्षाला जशाला तसे उत्तर देण्याची हिम्मत आमच्यात आहे. राजकीय मतभेद असले तरी वैयक्तिक पातळीवर जाऊन




अपमानास्पद वक्तव्य करणे योग्य नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाविरोधात घोषणाबाजी करत संबंधित वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त केला.

या निषेध मोर्चात नांदेड महानगराध्यक्ष तथा माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, नांदेड कार्याध्यक्ष माधव पावडे, प्रदेश सरचिटणीस वसंत पाटील सुगावे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.


इतर उपस्थितांमध्ये सुनील नानवटे, मोहम्मद खान पठाण, शिरीष देशमुख गोरठेकर, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक कैलास देशमुख गोरठेकर, उत्तमराव सोनकांबळे, महिला जिल्हाध्यक्षा सुनंदा जोगदंड, डॉ. मीनाक्षी कागडे, ॲड. एजाज, युवक जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे, लोहा तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी, धर्माबाद तालुकाध्यक्ष दीपक पाटील कदम, बाबुराव पाटील कदम, नारायण पाटील पवार, देगलूरचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार सावकार, देगलूर शहराध्यक्ष देवेंद्र मोतेवार, नगरसेवक स्वप्निल लुंगारे, मोहसीन खान पठाण, नेताजी भोसले, नगरसेविका सुमन कांबळे, गजू कांबळे, आनंदराव पाटील शिंदे, आनंदराव पाटील हेंडगे, श्रीपत पाटील शिंदे, सटवाजी मामा मोदलवाड, बाबुराव परतवाड मामा, प्रकाश पाटील बेलकर, प्रदीप पाटील पवळे, माधव पाटील उपासे, श्रीकांत पाटील शिंदे आदींची उपस्थिती होती.

# तुम्ही काम सुधारा, नाहीतर मला खांदेपालट करावा लागेल; एकनाथ शिंदेंची मंत्र्यांना वॉर्निंग

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याल पक्षातील काम न करणाऱ्या काही मंत्र्यांना फैलावर घेतल्याची माहिती समोर आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीपूर्वी शिवसेना पक्षाची स्वतंत्र प्री-कॅबिनेट बैठक पार पडली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या चार मंत्र्यांना सज्जड दम दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

या चार मंत्र्यांपैकी तीन जणांची नावे समोर आली आहेत. यामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, वने, मदत व पुनर्वसन तसेच मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा समावेश आहे. या मंत्र्यांनी आगामी काळात आपल्या कामगिरीत सुधारण न केल्यास त्यांचे मंत्रिपद काढून घेतले जाऊ शकते, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

प्री-कॅबिनेट बैठकीत बऱ्याच दिवसांनी एकनाथ शिंदे यांना रौद्रावतार पाहायला मिळाला. त्यांनी चार मंत्र्यांना कामगिरी सुधारण्याचा सज्जड दम दिला. तुम्ही सगळ्यांनी काम सुधारा नाही तर खांदेपालट करायची वेळ माझ्यावर येईल, असा स्पष्ट शब्दांत एकनाथ शिंदे यांनी संबंधित मंत्र्यांना इशारा दिला. यामध्ये संजय राठोड, दादा भुसे आणि संजय शिरसाट यांचा समावेश असल्याचे सांगितले जाते. या मंत्र्यांना वारंवार तंबी देऊनही त्यांच्या खात्याचा कारभार सुधारलेला नाही. याशिवाय, शिवसेना पक्षाच्या विस्तारासाठी या मंत्र्यांकडून अपेक्षित असलेले काम होताना दिसत नसल्याचे सांगितले जाते. परिणामी एकनाथ शिंदे या चार मंत्र्यांच्या कामावर खूश नसून त्यांनी संबंधितांना इशारा दिला आहे.




# १६ लाख ९६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात दोन दिवसांत निधी जमा होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने घोषित केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'च्या पहिल्या टप्प्यात १ लाख ४० हजार शेतकरी अपात्र ठरले आहेत. यामध्ये प्राप्तिकर भरणाऱ्या ९४ हजार, तसेच इतर प्रशासकीय व तांत्रिक त्रुटींमुळे अपात्र ठरलेल्या ४६ हजार शेतकऱ्यांचा समावेश आहे. दरम्यान, सर्व पडताळणी पूर्ण झालेल्या १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात येत्या दोन दिवसांत कर्जमाफीची रक्कम जमा केली जाणार असल्याची माहिती राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली घोषित करण्यात आलेली ही योजना राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे. यासाठी सुमारे ४० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा एकूण लाभ मिळणे अपेक्षित आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांपैकी ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत राहिलेल्या आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या २ लाखांपर्यंतच्या कर्जास पूर्णमाफी देण्यात येत आहे.

# डॉ. गोविंद नांदेडे यांच्या पदव्यांची 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांच्या ३८ विद्यापीठीय पदव्यांची जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली आहे. डॉ. गोविंद नांदेडे यांनी गेल्या पन्नास वर्षांत ३०४ विद्यापीठीय परीक्षा देऊन सात सुवर्णपदकांसह ३८ पदव्या प्राप्त केल्या आहेत. त्यांच्या या विक्रमी शैक्षणिक कार्याची 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' या संस्थेने दखल घेऊन या कार्याचा सन्मानपत्र, मेडल आणि स्मृती चिन्ह देऊन मुंबईमध्ये नुकताच गौरव केला आहे.

डॉ. नांदेडे हे कंधार तालुक्यातील शिराढोण या



गावाचे भूमिपुत्र आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी डीएड पूर्ण करून नांदेडमधील शारदा भवन शिक्षण संस्था आणि नांदेड जिल्हा परिषदेत पारडी आणि कलंबर खुर्द या खेडेगावात प्राथमिक शिक्षक म्हणून बारा वर्षे सेवा केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आणि डॉ. श्रीकांत जिचकार यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांनी ज्ञानाची अखंड आराधना केली. दरवर्षी कधी बहिस्थ, कधी दूरस्थ तर कधी सुटीतील बीएड, एमएड आणि मुक्त विद्यापीठातील परीक्षा देऊन या पदव्यांची साधना केली आहे. या ३८ पदव्यांमध्ये २२ विषयात एम. ए., दोन पीएच. डी., एमबीए, बीजे, एमजे, बीएसडब्लू यासारख्या इतर आणखी दहा पदव्यांचा समावेश आहे.

या पदव्यांमध्ये संत तुकोबारायांच्या साहित्यावर मराठी आणि शिक्षणशास्त्रावर दोन विद्यावाचस्पती अर्थात पीएचडी त्यांनी पूर्ण केल्या आहेत. डॉ. गोविंद नांदेडे यांच्या या विक्रमाचे महाराष्ट्रभर अभिनंदन करण्यात येत आहे.

# विजेच्या खांबावर चढलेल्या युवकाचा शॉक लागून मृत्यू



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या खडकपुरा भागात विजेच्या खांबावर चढलेल्या शोएब अब्दुल (वय ३७) याला शॉक लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. महानगरपालिका अग्निशमन आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या पथकाने त्याचा मृतदेह खाली उतरून शव विच्छेदनासाठी विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयात पाठवला. त्याच्या मृत्यूची चौकशी वजिराबाद पोलीस करत आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शाळांना कुलूप नव्हे, शिक्षणाला नवी दिशा हवी!

देशाच्या प्रगतीचा पाया शिक्षणात असतो, असे आपण सातत्याने म्हणतो. मात्र निती आयोगाच्या शालेय शिक्षणासंदर्भातील ताज्या अहवालाने शिक्षण व्यवस्थेतील काही गंभीर वास्तव समोर आणले आहे. गेल्या पाच वर्षांत देशातील तब्बल ९२ हजार शाळा कमी झाल्या, एक लाखांहून अधिक शाळा एकशिक्षकी आहेत आणि सुमारे आठ हजार शाळांमध्ये एकही विद्यार्थी नाही. ही आकडेवारी केवळ सांख्यिकीय माहिती नसून भारताच्या शैक्षणिक भविष्याबद्दल चिंता निर्माण करणारी आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, कमी पटसंख्येच्या शाळांचे विलीनीकरण, पुनर्गठन आणि एकात्मिक शाळा उभारण्याच्या धोरणामुळे शाळांची संख्या कमी झाली आहे. प्रशासनाच्या दृष्टीने हा निर्णय तर्कसंगत वाटू शकतो. परंतु या प्रक्रियेमुळे दुर्गम आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर काय परिणाम झाला, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. मराठी शाळा धडाधड बंद पडत आहेत आणि इंग्रजी शाळांची भूछत्रं गावोगावी उभारत आहेत. याद्वारे अप्रत्यक्षरीत्या गरिबांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात येतो आहे. गावातील शाळा बंद झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना दूरच्या शाळेत जावे लागते जे सर्वांना शक्य नसते. कारण वाहतुकीची अपुरी व्यवस्था, आर्थिक अडचणी आणि सुरक्षिततेच्या समस्या यामुळे अनेक मुले-मुली शिक्षणापासून दूर जातात. देशात सध्या १४.७१ लाख शाळांमध्ये २४.६९ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक स्तरावर प्रवेशाचे प्रमाण ९०.९ टक्के असले तरी उच्च माध्यमिक स्तरावर ते केवळ ५८.४ टक्क्यांवर येते. म्हणजेच प्राथमिक शाळेत दाखल होणाऱ्या प्रत्येक दहा विद्यार्थ्यांपैकी सुमारे चार विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचतच नाहीत. ही विद्यार्थी गळती केवळ शिक्षण विभागाची समस्या नसून देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासालाही बाधा आणणारी आहे. अहवालात विद्यार्थी गळतीची कारणे स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहेत. माध्यमिक शिक्षणाचा खर्च प्राथमिक शिक्षणापेक्षा अनेक पटींनी अधिक आहे. शिक्षणाचा हक्क कायद्याचे संरक्षण माध्यमिक शिक्षणाला नसल्यामुळे शुल्क, परीक्षा फी, प्रवास आणि इतर खर्च पालकांना करावे लागतात. गरीब कुटुंबांसाठी हा खर्च परवडणारा नसतो. परिणामी अनेक विद्यार्थी शिक्षण सोडून रोजगाराकडे वळतात. काहीजण घरातील जबाबदाऱ्या स्वीकारतात. मुलींच्या बाबतीत अल्पवयीन विवाह आणि शाळांमधील स्वच्छता सुविधांचा अभाव ही अतिरिक्त अडचण ठरते. एकशिक्षकी शाळांची संख्या एक लाखांपेक्षा अधिक असणे हेही गंभीर वास्तव आहे. एकाच शिक्षकावर सर्व वर्गांची जबाबदारी असल्यास गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा कशी करायची? विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीही शिक्षकांची संख्या आणि गुणवत्ता महत्त्वाची असते. शिक्षकांवरील वाढता ताण शिक्षणाच्या दर्जावर परिणाम करतो. महाराष्ट्राचे चित्र तुलनेने आशादायी असले तरी पूर्णपणे समाधानकारक नाही. आठवी ते दहावीपर्यंत विद्यार्थ्यांना टिकवून ठेवण्यात राज्याची कामगिरी चांगली आहे. मात्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर ३७:१ इतके आहे. राष्ट्रीय निकषांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. आज शिक्षणाला केवळ इमारती, डिजिटल फळे किंवा नवीन अभ्यासक्रमांची गरज नाही; तर विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून ठेवणाऱ्या संवेदनशील धोरणांची आवश्यकता आहे. माध्यमिक शिक्षण अधिक परवडणारे करणे, मुलींसाठी सुरक्षित आणि स्वच्छ शाळा उभारणे, दुर्गम भागात वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे, रिक्त शिक्षक पदे तातडीने भरणे आणि शाळा विलीनीकरण करताना विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. आपल्या देशाला ज्ञानाधिष्ठित महासत्ता बनवायचे असेल तर प्रत्येक मुलापर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचले पाहिजे. शाळा बंद होण्यापेक्षा शाळा विद्यार्थ्यांनी गजबजलेल्या असणे हीच खरी प्रगती आहे. शिक्षणातील प्रत्येक गळती म्हणजे देशाच्या भविष्यातील एका संधीची गळती होय. म्हणूनच शिक्षण क्षेत्रातील या इशाऱ्याकडे केवळ आकडेवारी म्हणून न पाहता राष्ट्रीय चिंतेचा विषय म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. कारण आज जर शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले, तर उद्याचा सक्षम, सुशिक्षित आणि स्वावलंबी भारत घडविण्याचे स्वप्न अपूर्ण राहण्याची भीती नाकारता येणार नाही.

# कपटनीती अधोगतीचे मूळ कारण



सध्या बरीच माणसे दिसायला वरवर चांगली दिसतात, परंतु त्यांच्या मनात खोड असते. आपल्याला असे बरेच उदाहरणे पाहता येतात की, छत्रपती शिवाजी महाराज यांना भेटण्यासाठी अफजलखान विजापूर येथून विडा उचलून वाईहून निघाला, पंढरपूर मार्ग तो प्रतापगडाच्या पायथ्याशी आला. तोंडामध्ये अतिशय गोड भाषा तो बोलू लागला. या राजे भेटा आम्हाला, तुम्ही आमच्या मुलासारखे आहात!, परंतु हे बोलणं त्याच फसवणूक (करणारे होतं. मनात कपट व खोड धरून गोड बोलून कायमस्वरूपी काटा काढण्यासाठी शामिन्यात आला होता, हे सर्व महाराजांनी ओळखून घेतले होते. त्यामुळे सोबत अंगरक्षक घेऊन अंगात चिलखत. बोटात वाघनखे, डोक्यावर जिरेटोप घालून ते त्याला भेटण्यासाठी अतिशय हुशारीने गेले होते, शेरास सव्वाशेर होते म्हणून महाराज वाचले, नसता इतिहास वेगळा झाला असता यालाच म्हणतात, तोंडात गोड आणि मनात खोड आहे. आज समाजामध्ये असे बरेच माणसं वेगवेगळे मुखवटे घालून फिरून फसवत आहेत. फक्त बोलताना अतिशय गोड बोलून आपल्या पायावर पाय देत आहेत, हे समाजातील लोकांनी ओळखून घ्यावे. जवळ बसणाऱ्या लोकसुद्धा अशा पद्धतीने वर्तन करत आहेत.

भाऊकीची लोक यामध्ये सर्वात पुढे असतात, कारण बोलण्याची भाषा वेगळी आणि वागण्याची भाषा वेगळी अलीकडच्या काळात तयार झाली आहे 'मुह मे राम। बगल मे छुरी' अशा पद्धतीने अगोदरपासूनच आपण ऐकतो. म्हणून सद्सद्विवेकबुद्धीने सध्याला वागण्याचा प्रयत्न करावे, कधीही कोणावरही शंभर टक्के विश्वास ठेवू नका? अति लोभ झाल्यानंतरसुद्धा वाईटपणा येतो, आणि मग असे माणसे मनात खोड ठेवून आपल्याला दगाफटका करण्याची दाट शक्यता असते. अनेक प्रेमवीर प्रेमिका सोबत गोड बोलत असतात आणि वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन अनैतिक कृत्ये करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. विवाहाचा विषय काढला की काय घाई आहे? आताच कोणते वय आपले झाले आहे, असे म्हणून चल पुढच्या...चल पुढच्या ओढ्यात असे गोड बोलून वेळ मारून नेतात आणि टाळतात.

हे सर्व सध्या सर्वत्र सुरूच आहे, त्यासाठी तुम्ही चाणाक्षबुद्धीने राहा, चला आपण इकडे जाऊ, तिकडे जाऊ, सहलीला जाऊ, मामाच्या गावाला जाऊ, देवदर्शन करून येऊ, म्हणून मुलींना गोड बोलून आपल्या मोहपाशात पाडून विश्वासात घेतात, आणि दगाफटका करतात. अपहरण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे गोड बोलणाऱ्या लोकांपासून दोन हात दूर राहावे, काही लोक बरेच नाटकी असतात, दिसल्या बरोबर लगेच वाकून नमस्कार करणे, तोंड भरून स्तुती करणे किंवा तेवढ्यापुरतेच बोलून आपला हेतू साध्य करून घेणे आणि लगेच सोडून देणे असे ही काही गणगोत आहेत, त्यामुळे गोड बोलण्याला फसवू नका काल्पनिक बोलण्याला भाळू नका, बरेच जण काल्पनिक मोठेपणा सांगतात, आम्ही आता हे घेणार आहोत? ते घेणार आहोत? आता आम्ही लगेच मोठी खरेदी करणार आहोत? असे बोलतात आणि वास्तविकता वेगळी असते. म्हणून 'लबाडाचं आवतण जेवण केल्याशिवाय खरे नसते', म्हणून आज समाज प्रगतशील झाला. सत्ता, संपत्ती, पैसा जवळ आला, परंतु माणुसकी दूर गेली, कारण तुम्हालाच निवडून देऊ म्हणणारे लोकसुद्धा एका रात्रीत बदलून जातात, आणि निकाल दुसऱ्याच बाजूने लागतो, त्यासाठी तोंडात अतिशय गोडवा धरून बरोबर एखाद्याची कशी खोड मोडायची ते मोडतात. म्हणून तुम्ही सगळे जाणून निर्णय घ्या. निर्णय क्षमता तुमची मजबूत असावी. जाहिरात करते वेळेस लोक अतिशय गोड बोलतात. तुमच्याकडून जाहिरातीचे पैसे काढून घेतात, आणि त्या जाहिरातीतून नंतर वेगळाच अर्थ निघतो. मग ते परत आपल्याला बोलू देत नाहीत.

एके ठिकाणी जाहिरातीत ट्रॅक्टर खरेदीवर मारुती (फ्री) मोफत दिला जाईल असे बोलले, मात्र त्यांनी मारूती गाडी देण्याऐवजी मारुतीची मूर्ती ग्राहकांना मोफत दिली असेही काही गोड बोलून फसवणारे लोक आहेत. सध्या समाजात काही बाबा, भगत, बुवा, महाराज वावरत आहेत. हे अतिशय गोड बोलून मठाच्या वाऱ्या करायला लावत आहेत. पुढच्या वारीमध्ये तुमचं चांगलं होईल, असं नुसतं गोड बोलून अज्ञानी निरक्षर माणसाची फसवणूक करीत आहेत. पैशाचा पाऊस पाडतो म्हणून सुशिक्षित लोकांनासुद्धा भगत फसवतात, हे त्यांना फार उशिरा कळते, म्हणून अशा लोकांपासून होता होईल, तेवढे सावधान राहण्याचा प्रयत्न करावे, अति गोड बोलणं धोकादायक असते असे अनेक उदाहरणावरून आपल्याला सांगता येते, त्यासाठी आपण संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय एखाद्या गोष्टीला होकार नकार देऊ नये. त्या ठिकाणची परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे, तेव्हाच आपल्याला खरी माहिती मिळते, चुकीच्या माहितीतून आपला घात होतो, बरेच लोक फक्त गोड बोलून तुम्हीच यंदाच्या निवडणुकीत भावी...होणार आहात, तुमच्या एवढे हुशार कोण आहे, बाकीच्यांना काय कळते, असे अर्धसत्य बोलून मोठेपणा देऊन हरभऱ्याच्या झाडावर चढवतात, आणि नंतर चारी मुंड्या चीत करून फिदी फिदी हसत बसतात, हे होऊ नये म्हणून कोणाच्याही गोड बोलण्याला भाळून जाऊ नका, आपल्या माणसांना थोडा मोठेपणा कोणी दिला की आपण फार भाळून जातो, संपूर्ण घरदार त्यांना दाखवतो, जमीन -जुमला नोकर चाकर, डामडौल त्यामुळे पुढील व्यक्तीला आपला अंदाज येतो, आणि आपण फसतो, त्यामुळे अलीकडच्या काळामध्ये विवाहासाठी गोड बोलून मुली आणून देत आहेत, आणि दोन-तीन दिवसात त्या मुली त्या घरातून दाग दागिने, पैसे घेऊन पोबारा करत आहेत.

गोड बोलून काम करून घेणे वेगळे आणि गोड बोलून मुद्दाम कपटनीतीने फसवणे वेगळे यात बराच फरक आहे. पुतना मावशी श्रीकृष्णाला दूध पाजण्यासाठी अप्सरेचे रूप घेऊन आली होती, मी कृष्णाची मावशी आहे. असे दरबारातील लोकांना सांगत होती, तिची ही कूटनीती श्रीकृष्णाने ओळखली होती. त्यामुळे तिला मरणाला सामोरे जावे लागले.

काही लोक फ्लॉट खरेदी-विक्रीमध्येसुद्धा गोड बोलून दोघांच्या नावावर खरेदी करून देतात, आणि मनातून फसवणूक करतात. महाभारतातील एक घटना वास्तविक आहे. धृतराष्ट्राने भीमाला आलिंगन देण्याची इच्छा व्यक्त केली, आणि त्यावेळेस तो गोड गोड बोलत असला तरी भीमाला त्याच्या बहुपाशात घेऊन ठार मारण्याची त्यांनी योजना आखली होती. ही कपटनीती श्रीकृष्णांनी ओळखली आणि धृतराष्ट्राच्या पुढे लोखंडी पुतळा तयार करून ठेवला. कपटनीती काय असते? कशा पद्धतीने वागून त्या घटनेमधून सही-सलामत बाहेर यावे, हे ज्याला कळते तो व्यवस्थित जीवन जगतो.

कपटनीतीने किंवा कुटनीतीने दुसऱ्याला फसवण्यासाठी केलेले कृत्य स्वतःच्याच अंगावर आलेली आहेत, अशी काही उदाहरणं आहेत. म्हणून कपट नीतीचा अवलंब करू नका. स्वतः श्रम करा आणि मोठे व्हा, त्यावेळेस आपली कीर्ती वाऱ्यासारखी सर्वत्र पसरते, शेअर्स मार्केटमध्ये दुप्पट पैसे करून देतो म्हणून अनेक लोकांना सध्या फसवले जात आहे. मोहामुळे लोक फसत आहेत, म्हणून आपण कुठेही न फसता,आपला प्रपंच करावा नेटका, त्यावेळी सर्व बरे होईल असे मला वाटते.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष,
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी,
ता. मुखेड जि. नांदेड

# नशिबाच्या पल्याड: कर्माने कोरलेले भविष्य

मानवी जीवनाच्या प्रवासातनशीब आणि कर्म या दोन संकल्पनांविषयी नेहमीच चर्चा होत असते. अनेकदा आयुष्यातील अनपेक्षित वळणांना आपण नशीब म्हणतो, तर स्वतःच्या मेहनतीने मिळालेल्या यशाला कर्तृत्वाचे फळ मानतो. पण खरोखरच आयुष्याचे सूत्र नशिबाच्या हातात आहे, की कर्माच्या?



खोलवर विचार केल्यास असे दिसते की, नशीब हे केवळ एक संधी असू शकते, पण ती संधी सत्यात उतरवण्याचे सामर्थ्य केवळ आणि केवळ तुमच्या कर्मात असते.

१. नशीब आणि कर्माचे वैज्ञानिक समीकरण विज्ञानाच्या भाषेत सांगायचे तर, कर्म आणि नशीब यांचा संबंध कार्य-कारण भावाशी३९; (Cause and Effect) आहे. न्यूटनचा गतीविषयक तिसरा नियम सांगतो की, प्रत्येक क्रियेला समान आणि विरुद्ध प्रतिक्रिया असते. आपण ज्याला ३९;नशीब३९; समजतो, तो प्रत्यक्षात आपण भूतकाळात केलेल्या विचारांचा, निर्णयांचा आणि कृतींचा एकत्रित संचय३९; (Cumulative Effect) असतो. ज्याप्रमाणे बियाणे पेरल्याशिवाय फळ मिळत नाही, त्याचप्रमाणे तुम्ही आज करत असलेले कष्ट (Input) हे भविष्यातील नशिबाचा (Output) आधार ठरतात. त्यामुळे नशीब हे आकस्मिक नसून, ते तुमच्या आजच्या कर्माचे वैज्ञानिक प्रतिबिंब आहे.

२. यशाचा काळ आणि कर्माची परिपक्वता आयुष्याच्या कोणत्या टप्प्यावर यश मिळेल, हे नशिबाच्या तारखेवर अवलंबून नसून, ते तुमच्या कर्माच्या तीव्रतेवर आणि तयारीवर अवलंबून असते. काहींना यश लवकर मिळते, तर काहींना उशिरा. यश मिळण्यास विलंब होतो, तेव्हा तो काळ वाया गेलेला नसतो; तर तो काळ तुम्हाला आणि तुमच्या कार्याला परिपक्व करत असतो. याच प्रवासात एक महत्त्वाची गोष्ट समजतेकठीण काळात तुमच्यासोबत कोण राहते आणि यशाच्या शिखरावर गेल्यावर कोण दूर होते. यश मिळायला जेव्हा वेळ लागतो, तेव्हा आयुष्यातील खऱ्या माणसांची ओळख पटते. ही ओळख म्हणजेच तुमच्या कर्माची खरी कमाई असते.

**३. इतिहासातील दीपस्तंभ :** कर्माने घडवलेली नशिबे छत्रपती शिवाजी महाराज: स्वराज्याची संकल्पना मांडताना महाराजांसमोर नशिबाची साथ नव्हती, तर प्रतिकूल परिस्थिती होती. तरीही, त्यांनी व्यवस्थापन, नीतिमत्ता आणि रयतेची साथ या कर्माच्या बळावर मूठभर मावळ्यांसह बलाढ्य शत्रूंना नमवले. त्यांनी सिद्ध केले की, नशिबाच्या चिठ्ठ्या ओढण्यापेक्षा कर्माच्या तलवारीने काळ घडवणे श्रेष्ठ असते.

महात्मा जोतिराव आणि सावित्रीबाई फुले: सामाजिक गुलामगिरीच्या नशिबाला छेद देण्याचे काम त्यांनी आपल्या कर्मातून केले. सावित्रीबाईंवर झालेली चिखलफेक हे त्यांच्या नशिबाचे दुर्दैव नव्हते, तर तो त्यांनी स्वीकारलेल्या क्रांतीच्या कर्माचा एक भाग होता. आजचे शिक्षित समाज हे त्यांच्या त्यावेळच्या अहोरात्र कर्माचे फळ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर: तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार हे ब्रीदवाक्य त्यांच्या संघर्षातून जन्मले. नशिबाने अस्पृश्यतेची बेडी दिली असतानाही, त्यांनी आपल्या कर्माने भारतीय राज्यघटना लिहीत नशिबाची दिशाच बदलून टाकली.

झाशीची राणी लक्ष्मीबाई: आयुष्यात दुःखाचे डोंगर कोसळले असताना नशिबाला दोष न देता, त्यांनी आपल्या शौर्याच्या कर्माने इतिहासात अमरत्व मिळवले.

४. यशाची किंमत आणि नाती जीवनात यशाच्या मागे धावताना अनेकदा जवळची माणसे दुरावतात. पण लक्षात घ्या, जर यश मिळवण्याच्या प्रक्रियेत तुमची नीतिमत्ता आणि माणुसकी जपली असेल, तर तुमच्या कर्माचे यश हे केवळ भौतिक नसून ते समाधानी असते. यश मिळाल्यावर अहंकार बाळगणे हे कर्माचे अधःपतन आहे, तर संघर्षाच्या काळात सोबत असलेल्यांना विसरून न जाणे, हेच खऱ्या यशस्वी माणसाचे लक्षण आहे.

५. **निष्कर्षाप्रत:** आयुष्याचे शिल्पकार आयुष्याचे गणित हे नशिबाच्या जुगारावर आधारित नसून, ते कर्माच्या गुंतवणुकीवर आहे. नशिबाला दोष देणे सोपे असते, कारण त्यामुळे आपण स्वतःच्या जबाबदारीतून मुक्त होतो. परंतु, जे स्वतःच्या कर्माची जबाबदारी घेतात, तेच काळाच्या पडद्यावर आपली नाममुद्रा उमटवतात. नशीब कदाचित तुम्हाला दिशा दाखवेल, पण त्या मार्गावर चालण्याचे आणि अंतर पार करण्याचे काम तुम्हाला स्वतःलाच करावे लागेल. म्हणून, नशिबाच्या खेळाकडे दुर्लक्ष करून आपल्या कर्माच्या जोरावर नशिबाचे शिल्पकार बना. तुम्ही आज जे पेरता, तेच उद्याच्या नशिबाचे पीक असते. नशिबाच्या नावावर रडणे थांबवा आणि आपल्या कर्माने उद्याचे भाग्य आजच घडवायला सुरुवात करा!

**-रोहित भोसीकर**
संचालक : भोसीकर फुड्स,
नांदेड, महाराष्ट्र.
संपर्क क्रं.: ८८०५५७५५५५

# भारताने गाजवले राष्ट्रकुल : नव्या क्रीडायुगाची दमदार चाहूल



ग्लासगो येथे पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताने केलेली कामगिरी प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद ठरली आहे. तब्बल ३९ पदकांसह भारताने चौथे स्थान पटकावत जगाला आपल्या वाढत्या क्रीडा सामर्थ्याची जाणीव करून दिली. यंदाच्या स्पर्धेत १२२ सदस्यीय भारतीय संघाने १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ९ कांस्य अशी पदकांची कमाई केली. ही कामगिरी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून भारतातील क्रीडा संस्कृती अधिक व्यापक होत असल्याचे स्पष्ट संकेत देणारी आहे.

यापूर्वी भारताची ओळख प्रामुख्याने कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन, बॉक्सिंग किंवा हॉकीपुरती मर्यादित होती. मात्र यंदाच्या स्पर्धेत बॉक्सिंग, ज्युडो, पॅरा-ॲथलेटिक्स, वेटलिफ्टिंग आणि ॲथलेटिक्ससारख्या विविध प्रकारांमध्ये भारतीय खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळवले. त्यामुळे भारत आता काही मोजक्या खेळांपुरता मर्यादित नसून विविध क्रीडा प्रकारांत सातत्याने प्रगती करत असल्याचे दिसून आले.

भारतीय बॉक्सरांनी यंदा सर्वाधिक प्रभाव पाडला. सात सुवर्णांसह एकूण दहा पदके जिंकत त्यांनी भारताच्या यशात सिंहाचा वाटा उचलला. पुरुषांसोबतच महिला बॉक्सरांनीही दमदार कामगिरी करत भारतीय क्रीडा क्षेत्रातील महिलांची वाढती ताकद पुन्हा सिद्ध केली. महिलांना योग्य प्रशिक्षण, संधी आणि प्रोत्साहन दिल्यास त्या जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

ज्युडोमध्ये भारताने प्रथमच आपली ठोस छाप उमटवली. हा खेळ भारतासाठी तुलनेने नवीन असला तरी भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट तंत्र, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर पदके मिळवत नवा इतिहास घडवला. भविष्यात या खेळात भारत अधिक मोठे यश मिळवू शकतो, अशी आशा या कामगिरीने निर्माण केली आहे.

वेटलिफ्टिंगमध्ये भारतीय खेळाडूंनी पुन्हा एकदा आपली परंपरा कायम राखली. मीराबाई चानूसारख्या खेळाडूंनी सुवर्णपदक जिंकून भारतीय वेटलिफ्टिंगची ताकद अधोरेखित केली. ॲथलेटिक्समध्ये अपेक्षेप्रमाणे सर्वच स्पर्धांमध्ये यश मिळाले नसले, तरी काही खेळाडूंनी जिद्दीने पदके जिंकून भविष्यासाठी आशेचा किरण दाखवला. पॅरा-ॲथलेटिक्समध्ये भारतीय खेळाडूंची कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली. शारीरिक अडचणींवर मात करून त्यांनी मिळवलेले यश केवळ पदकांपुरते मर्यादित नाही, तर ते संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या चिकाटीने आणि मेहनतीने भारतीय क्रीडाविश्वाला नवी ऊर्जा दिली आहे.

भारताच्या या यशामागे अनेक वर्षांची मेहनत, सुधारलेली क्रीडा धोरणे, अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा, खेळाडूंना मिळणारा आर्थिक पाठिंबा आणि प्रशिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे. 'खेलो इंडिया', 'टार्गेट ऑलिम्पिक पोडियम' यांसारख्या उपक्रमांमुळे देशात गुणवंत खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळत आहे. ग्रामीण भागातील प्रतिभावान खेळाडूंनाही आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळू लागली आहे. तरीही काही आव्हाने कायम आहेत. ॲथलेटिक्स, जलतरण, जिम्नॅस्टिक्स, सायकलिंग यांसारख्या खेळांमध्ये भारताला अजून मोठी झेप घ्यायची आहे. अनेक राज्यांमध्ये दर्जेदार क्रीडा सुविधा, प्रशिक्षक आणि आधुनिक प्रशिक्षण केंद्रांची कमतरता आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना आर्थिक मदत, पोषण आणि स्पर्धेच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेतील भारताची ही कामगिरी आगामी आशियाई स्पर्धा आणि ऑलिम्पिकसाठी सकारात्मक संकेत देणारी आहे. पदकांची संख्या वाढवण्याबरोबरच जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यावर भर दिला, तर भारत क्रीडाक्षेत्रातील महासत्ता बनण्याचे स्वप्न निश्चितच साकार करू शकतो.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मधील भारताचे यश हे केवळ पदकांचे यश नाही; ते भारतीय खेळाडूंच्या जिद्दीचे, मेहनतीचे आणि नव्या भारताच्या वाढत्या क्रीडा सामर्थ्याचे प्रतीक आहे. आता ही विजयी परंपरा कायम ठेवण्यासाठी सरकार, क्रीडा संघटना आणि समाज या सर्वांनी एकत्रितपणे खेळाडूंना अधिक सक्षम करण्याची गरज आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करा -सीईओ पाटील

## किनवट येथे आढावा बैठक; पेसा, घरकुल, स्वच्छता, विविध विकासकामांना गती देण्याचे निर्देश



**नांदेड (प्रतिनिधी)–** आदिवासीबहुल किनवट तालुक्यातील प्रत्येक गावापर्यंत शासनाच्या विकास योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचला पाहिजे. पेसा अंतर्गत उपलब्ध निधी वेळेत, पारदर्शकपणे आणि गुणवत्तापूर्ण विकासकामांसाठी खर्च करून आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासाला गती द्यावी. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करत निश्चित कालमर्यादेत ग्रामविकासाची उद्दिष्टे पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पाटील यांनी आदिवासीबहुल किनवट तालुक्याचा दौरा केला. पंचायत समिती, किनवट येथे झालेल्या तब्बल दोन तासांच्या मॅरेथॉन आढावा बैठकीत त्यांनी विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेत विकासकामांना गती देण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रभारी प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, व्हीबी-जी-रामजी, कर वसुली, पेसा, शाळा व अंगणवाडी तसेच ग्रामपंचायतींच्या विविध विकास योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शाळा व अंगणवाड्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे. तसेच १५ व १६ व्या वित्त आयोगाच्या निधीतून शाळा व अंगणवाडीत विद्युत व सौरऊर्जासाठी आवश्यक तरतूद करण्याचे निर्देश सीईओ पाटील यांनी दिले. पेसा अंतर्गत मंजूर निधी वेळेत खर्च करून विकासकामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत. विकासकामांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६ ची सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देताना प्रत्येक ग्रामपंचायतीत कचऱ्याचे चार प्रकारांत संकलन, विलगीकरण आणि व्यवस्थापन प्रभावीपणे राबविण्यावर त्यांनी विशेष भर दिला. घरकुलांची उद्दिष्टपूर्ती, व्हीबी-जी-रामजी योजनेची कामे, कर वसुली व स्वच्छ भारत अभियानाच्या प्रगतीबाबत संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रश्नावर विस्तार अधिकारी व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून प्रश्न मार्गी लावावा, असे निर्देश देतानाच आदिवासी भागातील नागरिकांना शासनाच्या सर्व योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमित क्षेत्रभेटी घेऊन गावपातळीवरील विकासकामांना गती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. बैठकीस तालुका आरोग्य अधिकारी डॉ. के. पी. गायकवाड, बाल विकास प्रकल्प अधिकारी एस. जी. जामुदे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार महामुने, विस्तार अधिकारी कैलास गायकवाड, जीवन कांबळे, निवृत्ती मुकनर, अमोल टोम्पे, अल्केश शिरसेटवार तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आढावा बैठकीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी बोधडी (बु.) येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुरू असलेल्या घरकुलांची प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामस्थांशी संवाद साधला. तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रस्तावित वसतिगृहाच्या जागेची पाहणी केली. त्यानंतर जलधारा येथे सुरू असलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी कार्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली. या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत त्यांनी असमाधान व्यक्त करत तातडीने गुणवत्ता तपासणी करण्याचे निर्देश दिले.

### एसटी महामंडळाला पंढरीचा विठूराया पावला

# आषाढीनिमित्तच्या बस फेऱ्यांमधून २ कोटी ८६ लाख ९३ हजार ८३४ रुपयांचे उत्पन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशीच्या पंढरपूर यात्रेनिमित्त वारकऱ्यांच्या सोयीसाठी नांदेड एसटी विभागाने मोठी पावले उचलली होती. भाविकांना सुलभ आणि सुरक्षित प्रवास मिळावा यासाठी नांदेड विभागातून पंढरपूरकडे १९३ अतिरिक्त बसेस सोडण्यात आल्या होत्या. या बसेसने चार लाख ७४ हजार २८१ किलोमीटर प्रवास करत दोन कोटी ८६ लाख ९३ हजार ८३४ रुपयांचे उत्पन्न विभागाला मिळवून दिल्याची माहिती विभागीय नियंत्रक अभय देशमुख यांनी गोदातीर समाचारशी बोलताना दिली.

एसटी महामंडळाच्यावतीने आषाढी यात्रेचा विचार करून विशेष नियोजन करण्यात आले होते. नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर या जिल्ह्यांतील प्रमुख आगारांमधून या बसेस सोडण्यात येतात. यामध्ये सामान्य, शिवशाही आणि आसन व्यवस्था असलेल्या बसेसचाही समावेश होता.

भाविक व प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दिवसभरात अतिरिक्त फेऱ्या वाढविण्यात आल्या होत्या. प्रवाशांची गर्दी टाळण्यासाठी ऑनलाइन आगाऊ आरक्षण करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले होते. प्रत्येक बससोबत चालक, वाहकासह आवश्यक कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

देशमुख यांनी सांगितले की, भाविकांनीही चांगला प्रतिसाद दिला. यात्रेदरम्यान कोणत्याही प्रवाशाची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष नियंत्रण कक्ष देखील सुरू करण्यात आला होता. या सर्व फेऱ्यांवरती विभागीय वाहतूक अधिकारी बालाजी भांगे यांचेही नियंत्रण होते.

वारकरी संप्रदायाने एसटी प्रशासनाच्या या निर्णयाचे स्वागत करुन बसेस वाढल्याने वारीसाठी जाणे अधिक सोयीचे झाले होते, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

नांदेड आगार- २८ बस- ४९, ७५, ८२४ रुपये उत्पन्न, भोकर- २०- (२४, ५३, ५५७), किनवट- १४- (१६, ६७, ५५६), मुखेड- ३०- ( ३६, ५९, ८१८), देगलूर- ३०- ( ३३, ३१, ००२), कंधार- ३० (४३, ४५, ०४६), हदगाव- १७ ( ३७, ५४, ०१४), बिलोली २० (३५, ७४, ४२५), माहूर- ४ (९, ३२, ५९२ रुपये) असे एकूण २ कोटी ८६ लाख ९३ हजार ८३४ उत्पन्न नांदेड विभागाला मिळाले. सन २०२५ गतवर्षी २३४ बसेसच्या माध्यमातून ३ कोटी ७३ लाख २६ हजार ६७ रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता.

# बीएलओची मतदार शोध मोहीम अंतिम टप्प्यात



**मुदखेड (प्रतिनिधी)–** तालुक्यात विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम तहसील प्रशासनामार्फत प्रभावीपणे राबवली जात असून, प्रत्येक गावातील बीएलओंना मतदार शोधताना पायपीट करावी लागत आहे. मतदार यादीतील मतदार प्रत्यक्षात गावातच राहत नसल्याचे चित्र समोर आले असून, अनेक घरे बंद तर काही कुटुंबे कायमस्वरूपी स्थलांतरित असल्याचे आढळून आले आहे. गेल्या अनेक वर्षापासून मतदार यादीत असलेल्या मृत व्यक्तींना वगळण्यात येत असून, नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असली तरीही गायब असलेले मतदार नव्या यादीतून डिलीट होणार असल्याच्या धास्तीने लोकप्रतिनिधी बीएलओची मात्र तारांबळ उडाली आहे.

भारत निवडणूक आयोग विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम अंतर्गत सन २००२ मतदार यादी नव्याने तयार केली जात आहे. यासाठी तालुक्यातील प्रत्येक गावात मतदार यादी दुरुस्ती प्रक्रियेचे काम प्रगतीपथावर आहे. उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार आनंद देऊळगावकर, पंचायत समिती गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबवली जात आहे. तहसील प्रशासनाने गाव पातळीवर शासकीय बीएलओची नियुक्ती केली आहे. यासोबत प्रमुख राजकीय पक्षाने प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी बीएलओ नियुक्त केले आहेत. नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया दि. २० जून २०२६ पासून वेगात सुरू आहे. प्रत्येक गावात याबाबत जनजागृती करण्यासाठी नायब तहसीलदार मारुती जाधव, नायब तहसीलदार विजयकुमार पाटे, नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, सेवाभावी संस्था आदींनी पुढाकार घेतला आहे.

मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रिया राबवित असताना बीएलओ यांना सर्व बाबींची बारकाईने तपासणी करावी लागत आहे. रोजगार शिक्षण व्यवसायासाठी शहराकडे स्थलांतरित झालेल्या अनेक कुटुंबीयांची नावे अद्यापही गावातील मतदार यादीत कायम असल्याचे पडताळणीत आढळून आले आहे. अनेक घरांना कुलूप असून बीएलओंना वारंवार चक्रा माराव्या लागत आहे . याशिवाय काही ठिकाणी एकाच व्यक्तीचे दोन वेगवेगळ्या प्रभागातील मतदार यादीत नाव असल्याचे आढळून आले आहे. यामुळे आता दुबार नोंदणी मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया सुरू आहे. स्थलांतरित मृत व्यक्तीचे नावे मतदार यादीतून वगळण्यात आले आहे.

# प्रभावी अंमलबजावणीसाठी नाविन्यपूर्ण अध्यापन आवश्यक -प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयातील संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभाग आणि इलेक्ट्रॉनिक्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या सहकार्याने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: २०२० अंतर्गत बी.एस्सी. तृतीय वर्ष अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यावर भर दिला. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी शिक्षक, महाविद्यालय व विद्यापीठ यांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी पीएम-उषा योजनेअंतर्गत उभारलेल्या आधुनिक सुविधा व शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी डॉ. योगेश एस. जोशी, डॉ. एस. यू. आवळे, डॉ. श्रीकांत जी. जाधव व डॉ. वाय. टी. नाखाते यांची प्रमुख उपस्थिती होती. इलेक्ट्रॉनिक्स विभागाने विकसित केलेल्या डिजिटल बुकचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. एस. यू. आवळे व डॉ. जी. डी. कुरुंदकर यांनी संगणकशास्त्र अभ्यासक्रमातील बदल, अभ्यासक्रम परिणाम, प्रकल्प कार्य व मूल्यमापन पद्धती यावर मार्गदर्शन केले. तर इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या सत्रात डॉ. योगेश जोशी, डॉ. एस. के. गोरे, डॉ. आर. एस. कावळे, डॉ. वाय. टी. नाखाते व डी. एस. दुलेवाड यांनी अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व आवश्यक सॉफ्टवेअरविषयी माहिती दिली.

कार्यशाळेला विद्यापीठ संलग्न विविध महाविद्यालयांतील प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ही कार्यशाळा मार्गदर्शक व उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. संदीप राठोड, डॉ. प्रवीण तामसेकर, डॉ. प्रवीण मिरकुटे, प्रा. संकेत देलमाडे, प्रा. अर्जुन गुरखुदे, डॉ. परम चिकटे, डॉ. पी. बी. पाठक, डॉ. एस. एम. शिंदे तसेच विद्यार्थी स्वयंसेवक ऐश्वर्या हमंद, साक्षी आणि विघ्नेश पतंगे यांनी परिश्रम घेतले. तसेच प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिराजदार व गजानन पाटील तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# गोवंश अवैध वाहतुकीवर अर्धापूर पोलिसांची धडक कारवाई; १० जनावरांची सुटका

## वसमत-अर्धापूर महामार्गावर सापळा; बोलेरोसह ४ वाहने जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने नांदेड जिल्ह्यात गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत अर्धापूर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धाडसी व नियोजनबद्ध कारवाई करून अवैधरित्या वाहतूक करण्यात येणाऱ्या गोवंशाची सुटका केली.

सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांना विश्वसनीय माहिती मिळाली की, वसमत येथून अर्धापूरकडे दोन बोलेरो पिकअप वाहनांमधून गोवंश जनावरांची कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतूक केली जात आहे.

त्यानुसार पोलीस निरीक्षक मांजरमकर यांनी ग्रामीण उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेल्या सूचनांवरून दोन पोलीस पथकांनी शिवाजी चौक, मालेगाव परिसरात सापळा रचून संशयित वाहनांना अडविले.

तपासणी दरम्यान बोलेरो पिकअप वाहन क्रमांक MH-२६-BE-७६५७ मध्ये गोवंश जातीचे एकूण ५ जनावरे आणि महिंद्रा बोलेरो पिकअप क्रमांक MH-२६-CH-२६२८ मध्ये गोवंश जातीचे एकूण ५ जनावरे अशी एकूण १० गोवंश जनावरे अत्यंत निर्दयपणे दोरींनी बांधून, कोणत्याही प्रकारच्या वैद्यकीय अथवा कायदेशीर परवानगीशिवाय अवैधरित्या वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. या पिकअप वाहनांसोबत टेहळणी करून मदत करणाऱ्या (MH-०२-EU-७०८६ व MH-३८-V-४६६६) ही दोन वाहनेही ताब्यात घेण्यात आली. या कारवाईत दोन बोलेरो पिकअप वाहने (अंदाजे किंमत १४ लाख), दोन चारचाकी वाहने (अंदाजे किंमत १० लाख ५० हजार), १० गोवंश जनावरे (अंदाजे किंमत ५ लाख २० हजार), विविध कंपन्यांचे ८ मोबाईल फोन (अंदाजे किंमत १ लाख ८१ हजार), इतर साहित्य असा एकूण ३१ लाख ५१ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# गीताबाई धर्माधिकारी यांच्या स्मरणार्थ बरबडा येथे आज वक्तृत्त्व स्पर्धा

**बरबडा (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील बरबडा येथे मातोश्री गीताबाई धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरणार्थ गुरुवार, दि. ६ ऑगस्ट रोजी जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्यावतीने वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत इयत्ता ५ वी ते ७ वीचे विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण जीवन योग्य की, शहरी जीवन योग्य हा विषय वक्तृत्त्व स्पर्धेसाठी देण्यात येणार असून, ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी सोशल मीडियाचा वाढता वापर, योग्य की अयोग्य हा विषय देण्यात येणार आहे. तसेच इयत्ता ११ व १२ च्या विद्यार्थ्यांसाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तारक की मारक हा विषय राहणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राचार्य व्ही. टी. सुरेवाड यांची उपस्थिती राहणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष माधवराव दिगंबरराव धर्माधिकारी, उपाध्यक्ष सदाशिवराव धर्माधिकारी, संचालक शिवाजीराव बळवंतराव धर्माधिकारी, इरन्ना कंडापल्ले, बरबडा नगरीच्या उपसरपंच छायाताई माधवराव धर्माधिकारी, विजयालक्ष्मी सदाशिवराव धर्माधिकारी, जगदीशराव धर्माधिकारी, ज्योतीताई धर्माधिकारी, संस्थेचे सहसचिव सुदर्शनराव धमाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे. तेव्हा बरबडा परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन उपमुख्याध्यापक गणेश बडुरे यांनी केले आहे.

# नायगावात ब्लू बेल्सच्या नव्या इमारतीचे खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते लोकार्पण



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नायगाव येथील ब्लू बेल्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या नव्या प्रशस्त व अत्याधुनिक इमारतीचे लोकार्पण रविवारी खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात झाले. पालक, विद्यार्थी, शिक्षक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना खासदार चव्हाण यांनी संस्थेचे संचालक के. हरिबाबू यांनी नायगावकरांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत ग्रामीण भागात दर्जेदार इंग्रजी शिक्षणाची भक्कम परंपरा निर्माण केल्याचे गौरवोद्गार काढले.

सन १९९५ मध्ये अवघ्या ४८ विद्यार्थी आणि दोन शिक्षकांच्या बळावर सुरू झालेली ही संस्था आज तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी अग्रगण्य शैक्षणिक संस्था बनली आहे. आधुनिक शिक्षणपद्धती, शिस्त, संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत संस्थेने ग्रामीण भागात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

प्रास्ताविकात संचालक के. हरिबाबू यांनी संस्थेच्या प्रवासाचा आढावा घेतला. संस्थेच्या उभारणीत योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास राजेश देशमुख कुंटूरकर, हनुमंतराव पाटील चव्हाण, श्रावण पाटील भिलवंडे, बालाजी बच्चेवार, मोहनराव पाटील धुपेकर, सय्यद रहीम, प्राचार्य लक्ष्मी मॅडम यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. नव्या इमारतीमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना अधिक आधुनिक सुविधा व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# मुदखेड तालुक्यातील बारड महसूल मंडळातील शेतकऱ्यांचा पीक विमा मिळण्याचा मार्ग मोकळा

**मुदखेड (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०२५ मधील बारड महसूल मंडळातील मंजूर विमा हप्ता राज्य शासनाचा हिस्सा उपलब्ध नसल्यामुळे विमा कंपनीकडून संबंधित शेतकऱ्याच्या खात्यावर विमा रक्कम जमा करण्यात आलेली नव्हती. बारड महसूल मंडळातील प्रलंबित राज्य शासनाच्या ७.१७ कोटी रुपये विषयाला मंजुरी मिळाल्याने विमा हप्ता लवकरच मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुदखेड तालुक्यातील बारड, मुदखेड व मुगट महसूल मंडळाचा मिळून एकूण ३०.४५ कोटी विमा २५ -२६ मध्ये रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. त्यापैकी मुदखेड महसूल मंडळातील ८.८७ कोटी व मुगट महसूल मंडळातील १४.४१ कोटी विमा रक्कम यापुर्वी वितरित करण्यात आलेली आहे. सन २०२५ मध्ये एकूण १८६५० शेतकऱ्यांनी पिक विमा कंपनीस अर्ज केले होते.

यावर्षी प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम सन २०२६-२७ अंतर्गत मुदखेड तालुक्यातील एकूण १५७३३ शेतकऱ्यांनी विविध पिकासाठी २४९३३ अर्ज सादर केलेले आहेत. यासाठी एकूण २.०५ कोटी रुपये शेतकरी हिस्सा शेतकऱ्यांनी विमा कंपनीस भरलेला आहे. एकूण १०२.४१ कोटी रुपये विमा संरक्षित रक्कम आहे.

सोयाबीन तूर, मूग, उडीद, कापूस व ज्वारी अशा खरीप हंगामातील विविध पिकांसाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलै होती ती वाढीव करून १० ऑगस्ट २०२६ आहे. तरी ६ दिवस शिल्लक असल्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी पीक विमा भरून आपले पीक संरक्षित करावे, असे आवाहन डॉ.अमरज्योती गच्चे तालुका कृषी अधिकारी मुदखेड यांनी केले आहे.

# नांदेड जिल्हा कुलेकडगी समाज संघ, नांदेडच्यावतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार, कृषीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सोहळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** संस्थापक अध्यक्ष कै. माधवराव कस्तुरे गुरुजी व संस्थापक सचिव कै. प्रा. हरिदास कवडे यांच्या जयंतीनिमित्त नांदेड जिल्हा कुलेकडगी समाज संघ, नांदेड च्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी समाजातील दहावी, बारावीतील गुणवंत व पाचवी, आठवी शिष्यवृत्तीधारक, एम.बी.बी.एस. व बी.एस.एम.एस. प्रवेशित, कृषीनिष्ठ शेतकरी, नव्याने सेवेत रुजू झालेले कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेश्वर गाडे उद्योजक तेलंगणा, प्रमुख वक्ते विपिन कळसकर कक्ष अधिकारी मंत्रालय मुंबई, व एकनाथराव पावडे सेवानिवृत्त विक्रीकर निरीक्षक तर प्रमुख पाहुणे एच.व्ही. आरगुंडे उपसचिव, मुख्यमंत्री कार्यालय मुंबई, सुरेशराव ईटकापल्ले उद्योजक मुंबई, बालाजी तुमवाड सेवानिवृत्त मुख्याध्यापक, समाज संघटनेचे अध्यक्ष भगवानराव राचेवाड, माजी अध्यक्ष आनंदराव आनंतवाड, संस्थापक अध्यक्ष यांचे चिरंजीव शिवाजीराव कस्तुरे संस्थापक सचिव यांची पत्नी गिरजाबाई कवडे हे उपस्थित होते. हा प्रेरणादायी कार्यक्रम रविवार, दि. २६ जुलै रोजी कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह (स्टेडियम), नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता.

उद्योजक सुरेशराव ईटकापल्ले मनोगत व्यक्त करताना म्हणाले विद्यार्थ्यांनी, पुरूषांनी व महिलांनी शिक्षणासोबतच व्यवसायाची कास धरावी, असे सांगून वसतिगृहातील विद्यार्थी श्रीराम बकवाड, दत्ता आनंतवाड, वेदांत मुंगेवाड या आठवी शिष्यवृत्तीधारक व एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीधारक आणि इतर प्रगतीसाठी जिल्हा संचालक मंडळ व वसतिगृह समितीचे अभिनंदन केले. मोबाईलने जगाला जवळ केले आणि कुटुंबाला दूर केले यापासून विद्यार्थ्यांना बारावीपर्यंत दूर ठेवा, अशी विनंती सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी तुमवाड यांनी केली.

प्रमुख वक्ते विपिन कळसकर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी व पालकांनी आपण जोपासत असलेल्या सवयी यातूनच व्यक्तिमत्त्व व चारित्र्य संपन्न होते, त्यासाठी चांगल्या सवयीची जोपासना करावी, असा सल्ला दिला. ते पुढे म्हणाले आज तरूणांचा कल वाईट गोष्टींकडे आहे. तरूणांनी स्वतः काळजी घ्यावी कारण आपण सक्षम नसेल तर या स्पर्धेच्या युगात टिकू शकणार नाही. त्यासाठी आपण स्किल डेव्हलपमेंटवर लक्ष द्या. एआयच्या युगात आपणास व्यक्तीसोबत नव्हे तर मशिनसोबत स्पर्धा करावी लागणार आहे, त्यासाठी लागणारे सर्व स्किल संपादन करा. त्यासोबत आनंदी राहण्याची कला जोपासली पाहिजे.

प्रमुख पाहुणे एच.व्ही आरगुंडे यांनी वसतिगृहातील संचालक मंडळ, जिल्हा संचालक मंडळ, तालुका प्रमुख यांचे कौतुक करत राजेश्वर गाडे यांनी समाजहितासाठी जे दायीत्व स्वीकारले त्यांचही कौतुक केले. वसतिगृहातील विद्यार्थी संख्या लवकरच शंभर करायची आहे. तसेच मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू करायचे आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेश्वर गाडे यांनी आपणही समाजाचे देणे आहेत या भावनेतून अनेक वर्षांपासून काहीतरी देणगी देऊ असली भावना होती आहे, असे ते म्हणाले आणि वसतिगृहाचे जे बांधकाम चालू आहे त्याचा चौथा मजला अतिशय चांगल्या पद्धतीने बांधून देणार तसेच काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाचे मेंटेनन्सही देण्याचे मान्य केले.

# शिवशंभू नगर लातूर फाटा येथे सिमेंट काँक्रीट रस्ते व पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याची मागणी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** शिवशंभू नगर, गट क्र. ६७/१ लातूर फाटामध्ये अंतर्गत सिंमेट रस्ते, विद्युत रोहीत्र व नळ योजना करावी, अशी मागणी शिवशंभू नगरी नागरिकांच्या वतीने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर व नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नांवामनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या प्रभाग क्रमांक १९ मध्ये असलेल्या शिवशंभू नगर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून नागरीक मोठ्या संख्येने राहत असून, मालमत्ता कर भरून ही मूलभूत सुविधाअभावी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास करावा लागत आहे, परिसरात ये-जा करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून रस्ते नसल्याने नागरिकांनी स्वखर्चाने मुरूम टाकून पर्यायी व्यवस्था केली, परंतु पावसाळ्यात नागरिकांचे बेहाल होत असल्याने मुख्य रस्त्यावर दुचाकी चारचाकी वाहने पार्किंग करावी लागत आहे. तर पाणीपुरवठा योजना या भागात नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी नळ कनेक्शन देण्यात यावी हि मागणी निवेदनाद्वारे केली असून प्रत्यक्ष नांदेड शिवसेना दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांना प्रमुख रस्ते दाखवण्यात आले असून या भागासाठी तात्काळ सिमेंट काँक्रीट रस्ते करून द्यावे, अशी मागणी केली आहे.

यावेळी माजी नगरसेवक अशोक मोरे, सेवानिवृत्त उपनिरीक्षक पौळ, कल्याण पाड, अशोक शिवनगावकर, लक्ष्मण श्रीवास्तव, ओमप्रकाश पेडंकर, प्रविण देवडे, हाळदेकर, अशोक लोंढे, शिवलिंग देशमुख, बोडके, प्रशांत पेडकर, गुरूपवार, अमोल धानोरकर, सविता पेडंकर, उज्ज्वला पौळ,ज्योती लोंढे, अश्विनी देशमुख, सुनिता शिवनगावकर, प्रणिता मुंढे, अनुसया गिते, जयश्री गिते, सुप्रिया बोडके, अनंता दिलेराव यांच्यासह नागरिकांनी केली आहे.

## सूचना
**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.**
**दिनांक : २३.०३.२०२६**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

शासन सूचना क्र.टिपीएस-९८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/भारत मंडपम/कन्व्हेशन सेंटर/सूचना/नवि-१३:-. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख ''उक्त नियमावली'' असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र. २३६/१८/ वियो. व प्रायो./कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्तं नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/नवि-१३, दि.२०.०३.२०२५ अन्वये भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सात. महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये भारत मंडपम या नामाभिधानाने किमान ३० एकर क्षेत्राखालील जागा आरक्षित ठेवण्याकरिता उक्त अधिनियमान्वये कलम ३७ (१) अन्वयेचा परिपूर्ण फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वयेचे निदेश पारित केले आहेत (यापुढे उक्त निदेश असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, शासनाने दि.२०.०३.२०२५ रोजी पारित केलेल्या उक्त निदेशानुसार भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या मंजूर विकास योजनेमधील भारत मंडपम / कन्व्हेशन सेंटर या नामाभिधानाचे आरक्षणाचे सुयोग्य विकसनाच्या दृष्टीने उक्त नियमावलीच्या विनियम क्र.११.१ (Table No.11A) मध्ये नवीन तरतुद क्रमांक ८ (A) व त्यासह विनियम क्र.४.२७.५ (y) या दोन तरतुदी नव्याने समाविष्ट करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त फेरवदल असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) व कलम २० (३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तनुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती. ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिकारी असा करण्यात येत आहे);

ही सूचना, कामकाजांचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.
१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती /छत्रपती संभाजीनगर विभाग,
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
६. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई,
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापुर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण,
८. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
१०. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

ही सूचना शासनाचे संकेतस्थळे www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरीत/-
**(प्रणव कर्पे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट –अ**
**शासन सूचना क्र. टिपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/भारत मंडपम/कन्व्हेशन सेंटर/सूचना/नावि-१३, दि. २३.०३.२०२६ सोबचे सहपत्र**

I. The following New Provision nt Sr. No.11 A - "Bharat Mandapam / Convention Centre" is proposed to be added in Regulation No.11.1 (Table No.11- A Sr.No.8 - Assembly & Institutional) of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows-

**<u>New Provision :-</u>**

**Regulation No.11.1 (Table No.11-A Sr. No.8 - Assembly & Institutional)**

| S (A) Assembly and Institutional | | |
|---|---|---|
| I. Bharat Mandapam<br><br>II. Convertion Center | Planning Authority/ Appropriate Authority/ Owner | I. In case of Bharat Mandapam, this reservation shall be proposed only in the jurisdiction of areas of the Municipal Corporations mentioned in the directives dt.20.03.2025 issued by the State Government u/s 154 of the MR & TP Act, 1966 and as amended by the State Government time to time.<br>II. For the Bharat Mandapam reservation, the area of the plot should be 30 acre or more.<br>III. For the Convention Centre reservation, the area of the plot should be 50,000 sq.mts or more.<br>IV. Appropriate Authority for development/ redevelopment of the said reservations shall be concerned Municipal Corporation /Maharashtra Tourism Development Corporation.<br>V.. The Planning Authority/Appropriate Authority may acquire and develop the site for the same purpose,<br>OR<br>The Planning Authority/Appropriate Authority after acquiring the land lease it out for developing and running or after developing itself, lease out for running it, as the case may be, as per the provisions of the Authorities Act to a 'Registered Institution/ Agenoy having requisite expertise in the field,<br>OR<br>The Planning Authority or Appropriate Authorities may entrust the development, operation and maintenance of the entire reservation to an appropriate agency.<br>i. The Authority may allow the owner to develop the reservation, subject to handing over to the Planning Authority an independent plot along with constructéd amenity of total area, mentioned in Note-1 below this table & as per norms prescribed by the Authority.<br>ii. The owner shall be entitled to develop remaining land for the uses permissible in adjoining zone with full permissible FSI of the entire Plot and permissible TDR potential of the entire Plot. |
| | | iii. The Authority, if required, shall allow the TDR for the unutilized FSI, if any (after deducting in-situ FSI), to be utilised as per TDR Regulations.<br>iv. Reservation may be allowed to be developed in parts with special permission of the commissioner subject to following conditions:-<br>a. Minimum area of such part shall be 25% of the total reservation.<br>b. The amenity to be handed over to the authority shall be planned in such way that an integrated amenity after development of entire reservation will be available to the authority.<br>OR<br>**For Bharat Mandapam**<br>A) The owner can develop Bharat Mandapam Amenity on 50% of the reservation land and utilize remaining 50% land for his own development as permissible under the prevailing regulations for Residential and Commercial development. |
| | | OR<br>A) The owner can develop Bharat Mandapam Amenity on 500% of the reservation land and utilize remaining 50% land for his own development as permissible under the prevailing regulations for Residential and Commercial development.<br>B) The owner can develop Bharat Mandapam Amenity with development potential of 50% plot as per table 6G of Regn 6.2 considering this as separate plot.<br>C) The owner can develop remaining 50% of land considering this as an independent plot with potential as per table 6G of Regn. 6.2 or under any other applicable provisions. FSI advantage in lieu of 50% land to be developed as Bharat Mandapam Amenity! shall not be allowed on the remaining 50% land used for development by the owner.<br>D) The owner can himself construct the Bharat Mandapam Amenity as per the design and specifications duly approved by the Authority and operate the same for the intended purpose. However, no benefit-either monetary or in the form of TDR shall be permissible to the owner. The Authority and the owner shall execute MOU regarding. operation of the Amenity.<br>E) In future, if the owner desires to handover the Bharat Mandapam Amenity and the Authority consents, then the owner is entitled to only TDR as mode of compensation for the land as per the then prevailing norms at the time of surrender. The owner shall not be entitled to any compensation for the construction of amenity, either TDR or monctary or any other form<br>F) Uses permissible shall be as listed in the National Strategy for MICE: Industry 2022 in Section 2.2.8;<br>Provided tint, maximum 30% of the tolal built-up area can be used for uncillary uses such as Hotels, Banquet venios etc.<br>The list of ancillary uses for successful implementation of this Reservation shall be finalised by the Municipal Commissioner of the plamiing authority with reasons recorded in writing. |

II. The following New Provision at Sr. No. (y) is proposed to be added at the end of Regulation No. 4.27 of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows-

**Regulation No. 4.27 USES PERMISSIBLE IN DEVELOPMENT PLAN RESERVATIONS.**

5) Combination of uses as mentioned below may be permissible with the permission of the Authority even if the reservation is for a specific purpose:

y) Bharat Mandapam / Convention Centre - Uses permissible shall be as listed in the National Strategy for MICE Industry 2022 in Section 2.2.8;

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**स्वाक्षरीत/-**
**(प्रणव कर्पे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

## NOTICE
Government of Maharashtra
Urban Development Department
Mantralaya, Mumbal-400 032
Dated: 23.03.2026

*The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966*

No.TPS-1825/179/CR-34/2025/ Bharat Mandapam /Convention Center/Notice/UD-13 :-Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) (hereinafter referred to as "the said UDCPR Regulations") for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, & some Planning Authorities under the provisions of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPS-1818/CR.238/18/DP. & RP/Sec.37 (IAA) (c) & sec.20(4)/UD-13, dated 02/12/2020 and the said UDCPR regulations are come into force from dt.03.12.2020;

And whereas, the Government of Maharashtra vide Government Resolution No. TPS-1825/179/C.R.34/2025/ UD-13, dated 20.03.2025, had issued directives u/s 154 of the said Act (hereinafter referred to as "the said Directives") to submit a Comprehensive modification proposal u/s 37(1) of the said Act, for reserving the land admeasuring area at least 30 acres under the designation of "Bharat Mandapam" within the jurisdiction of seven Municipal Corporations in the State, on the basis of the Bharat Mandapam Cultural Centre;

And whereas, as per the said directives issued by the State Government dated 20.03.2025 u/s 154 of the said Act, the Government of Maharashtra is of the opinion that, it is necessary to incorporate two New Provisions namely New Provision No. 8 (A) in Regulation No. 11.1 (Table No. 11-A) and Regulation No. 4.27.5 (y) into the said Regulations, with a view to proper development of "Bharat Mandapam / Convention Center" reservations in the sanctioned Development Plans of all Planning Authorities in the State, on the basis of the Bharut Mandapam Cultural Centre, (hereinafter referred to as "the said modification ");

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(1AA)(a) and 20(3) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public in respect to the said modification. Any objections/suggestions upon the said modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette, to the concerned Divisional Joint Director of Town Planning who is hereby authorised as "an Officer" to hear objections/suggestions and say of concerned Planning Authoritles, as applicable, and submit his report to the Government (hereinafter referred to as "the said Officer").

This Notice is kept for Inspection to the general publlo in the following offices for the period of one month on all working days.
1. The Divisional Joint Director of Town Planning, Konkun / Pune/ Nagpur / Nashik Amravati/Chhatrapatl Sambhaji Nagar Division.
2. The Commissioners All concerned Munlelpal Corporations. (Except.Brihinmumbai Municipal Corporatlon)
3. The Collectors, All Districts.
4. The Metropolitan Commissioners, All Metropolitan Regions Developments Authorities.
5. Office of the Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai.
6. Office of the Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8 Floor, World Trade Centre, Mumbai-.5
7. The Chief Executive Officer, Kolhapur Urban Arca Development Authority, Kolhapur.
8. All Special Planning Authorities New Town Development Authorities.
9. The Chief Executive Officer, All Zilla Parishads.
10. The Chief Officers, All Municipal Councils/ Nagar Panchyats.

This notice is also available on the Government website www.maharashtra.gov.in (Acts/Rules).

*By order and in the name of the Governor of Maharashtra.*

Sign/-
(Pranav Kapre)
Deputy Secretary to Government

## Sehedule - A
**Accompaniment of the Government Notice, No. TP8-1825/179/CR-34/2025/Bharat Mandapam/ Convention Center/Notice/UD-13, dated:23.03.2026**

II. The following New Provision nt Sr. No.11 A - "Bharat Mandapam / Convention Centre" is proposed to be added in Regulation No.11.1 (Table No.11- A Sr.No.8 - Assembly & Institutional) of Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) For Maharashtra State As Follows-

उर्वरित पान ५ वर...

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## सहस्त्रकुंड विकासाला गती देण्याची कॅप्टन आशिष दामले व निखिल लातूरकर यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातील प्रसिद्ध सहस्रकुंड तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास, १५ फूट उंच भगवान परशुराम यांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना तसेच परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी आवश्यक शासकीय परवानग्या आणि विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा मंत्री दर्जाचे कॅप्टन आशिष दामले यांनी जिल्हाधिकारी नांदेड व किनवटचे आमदार भीमराव केराम यांच्याकडे स्वतंत्र पत्रांद्वारे केली आहे.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे सन १९८२ च्या महापुरात वाहून गेलेल्या भगवान परशुराम यांच्या मूर्तीची तब्बल ४४ वर्षांनंतर अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, सहस्रकुंड मंदिर समितीचे सचिव सतीश वाळकीकर, स्थानिक ट्रस्ट, सामाजिक कार्यकर्ते व ब्राह्मण समाजाच्या संयुक्त प्रयत्नांतून पुनःप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे सहस्रकुंड तीर्थक्षेत्राच्या विकासाला नवी दिशा मिळाल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

पैनगंगा नदीवरील धबधबा, परशुराम टेकडी, गोमुख तीर्थ, सीतामाईची नान्ही आणि बाणगंगा महादेव मंदिर यांमुळे सहस्रकुंड हे धार्मिक श्रद्धा आणि निसर्ग पर्यटनाचा सुंदर संगम मानले जाते. राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक येथे येत असल्याने १५ फूट उंच भगवान परशुराम यांच्या भव्य मूर्तीची अधिकृत प्रतिष्ठापना, परिसराचे सौंदर्यीकरण आणि मूलभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक असल्याचे कॅप्टन दामले यांनी आपल्या पत्रात अधोरेखित केले आहे.

यासाठी नियमानुसार आवश्यक सर्व शासकीय परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) तातडीने देण्याबरोबरच जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी) अथवा आमदार स्थानिक विकास निधीतून विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या नेतृत्वाखाली आणि सहस्रकुंड मंदिर समितीचे सचिव सतीश वाळकीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाकांक्षी धार्मिक व पर्यटन विकास प्रकल्प प्रत्यक्षात साकारण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे पत्रातून स्पष्ट होते.

# ॲलोपॅथी डॉक्टरांचे कामबंद आंदोलन

## होमिओपॅथी डॉक्टरांना एमएमसी नोंदणीला विरोध

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यात सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ पासून सुरू झालेले ॲलोपॅथी डॉक्टर्सचे बेमुदत कामबंद आंदोलन हे राज्य सरकारच्या एका वादग्रस्त निर्णयाविरोधात असल्याचे सावंतवाडी- वेंगुर्ला- कुडाळ येथील आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. जयंत परुळेकर यांनी म्हटले.

राज्यात सध्या २ लाख १० हजार ॲलोपॅथी डॉक्टर्स आहेत. ते गेली अनेक दशके कार्यरत असलेल्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत आहेत. देशातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरून प्रॅक्टिस करण्यास कायदेशीर बंदी आहे. असे असताना राज्यातील फडणवीस सरकारने एक वर्षाचा ॲलोपॅथी औषधशास्त्र या विषयाचा जोड कोर्स करून होमिओपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये नोंदणी करण्याची परवानगी दिली आहे. डॉक्टरांच्या मते, ही मुभा नसून खोगीरभरती करण्याचा कुटील डाव आहे.

या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात खटला प्रलंबित आहे आणि निकाल येणे बाकी आहे. असे असतानाही घाईघाईने होमिओपॅथी डॉक्टरांना बेकायदेशीररीत्या एमएमसी नोंदणी करू देणे हा एक प्रकारे गुन्हा असल्याचा आरोप ॲलोपॅथी डॉक्टरांनी केला आहे. त्यांच्या मते, यामुळे राज्यातील सामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात येणार आहे. केवळ वर्षभराचा म्हणजेच १०४ दिवसांचा वीकेंड कोर्स करून ॲलोपॅथी वैद्यकीय शास्त्र समजते, असा जावईशोध सरकारने लावल्याची टीका त्यांनी केली.

या निर्णयामागे मोठे अर्थकारण दडले असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. राज्यात जवळपास ८६ खाजगी होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालये आहेत. सध्या तेथील अनेक जागा दरवर्षी रिक्त राहतात. पण आता अशा प्रकारचा निर्णय झाल्याने होमिओपॅथी डॉक्टरांना एमएमसी नोंदणी मिळू शकते. या बातमीमुळेच या सर्व खाजगी महाविद्यालयांच्या जागांची मागणी वाढेल. एकेक सीट ५ ते १० लाख रुपयांना विकली जाईल. हा हजारो कोटी रुपयांचा गोरखधंदा सामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ करून मांडला जात असल्याचा आरोप आंदोलक डॉक्टरांनी केला आहे.

### डॉक्टरांची भूमिका

या बेकायदेशीर निर्णया-विरोधातच राज्यातील ॲलोपॅथी डॉक्टर्स कामबंद आंदोलन करत आहेत. यामुळे सामान्य रुग्णांना जो त्रास होत आहे त्याबद्दल सर्वच ॲलोपॅथी डॉक्टरांच्या मनात व्यथा आहे. परंतु या सर्व मनःस्तापाला आणि उद्वेगाला सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

## मारहाण करून लुटणाऱ्या सात महिलांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील सिद्धार्थनगर परिसरात २५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २.३० ते ३.३० वाजेच्या दरम्यान एक धक्कादायक घटना घडली. विजयनगर येथील ७ महिलांच्या टोळीने संगनमत करून एका महिलेला घरी बोलावून तिची मारहाण करून लूट केली. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, सर्व ७ आरोपी अटकेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपींनी फिर्यादी महिलेला एका कामानिमित्त सिद्धार्थनगर येथील घरी बोलावले. तिथे आधीच जमलेल्या टोळीने तिला संगनमत करून मारहाण केली. यातच न थांबता आरोपींनी फिर्यादीचे अंगावरील कपडे फाडले आणि तिचे फोटो काढून व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला घाबरवले. तसेच आरोपींनी फिर्यादीकडून जबरदस्तीने पाचशे रुपये रोख, फोन पेवरून पाच हजार, ८५ हजार रुपये किमतीची सहा ग्रॅम सोन्याची हातातील अंगठी आणि फिर्यादी सोबत आलेल्या एकाच्या फोनपे वरून ५१ हजार रुपये असा एक लाख ४१ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जबरीने काढून घेतला.

भाग्यनगर पोलिसांनी या प्रकरणातील सर्व आरोपी विजयनगर, नांदेड येथील रहिवासी असल्याचे सांगितले. आरोपीतांमध्ये इंदूबाई मुंजाजी बाराटे, शीला सुनिल भदरगे, सुनिता रमाकांत सोनकांबळे, कविता गोविंद जलताडे, पूजा गजानन चव्हाण, रेखा आनंद पुरी आणि अमन मारोती कांबळे यांचा सहभाग आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४१८/२०२६ दाखल करण्यात आला आहे. यात BNS-२०२३ चे कलम ३१०(२), ३०८(३), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्यातील सर्व ७ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

## १५ वर्षांपासून बंद असलेला डोणगावचा रस्ता हायकोर्टाच्या आदेशानंतर मोकळा

**शंकरनगर (प्रतिनिधी)** –बिलोली तालुक्यातील मौजे डोणगाव खुर्द येथील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी अखेर पूर्ण झाली असून, सुमारे १५ वर्षांपासून बंद असलेला रामतीर्थ-डोणगाव खुर्द मार्ग हायकोर्टाच्या आदेशानुसार व बिलोली तहसील प्रशासनाच्या पुढाकाराने मोकळा करण्यात आला.



गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, डोणगाव येथील शेतकरी सुरेश पेरके यांनी रस्ता त्यांच्या शेतातून जात असल्याचा दावा करत हा मार्ग अनेक वर्षांपासून बंद केला होता. त्यामुळे डोणगाव खुर्द येथील नागरिकांना शंकरनगर येथील शासकीय कार्यालये, पोलीस ठाणे, बँक, शाळा तसेच इतर अत्यावश्यक कामांसाठी जाण्यास तब्बल १५ ते २० किलोमीटरचा अतिरिक्त प्रवास करावा लागत होता.

या प्रश्नावर गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, तसेच हायकोर्टापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला. अखेर या प्रयत्नांना ४ ऑगस्ट रोजी यश आले. हायकोर्टाच्या आदेशानुसार बिलोली तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार बालाजी मिठेवाड आणि मंडळ अधिकारी कल्पना मुंडकर यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन गावकऱ्यांच्या उपस्थितीत जायमोक्यावर जाऊन सिमारेषा निश्चित केली व १५ वर्षांपासून बंद असलेला रस्ता मोकळा करून दिला.

रस्ता सुरू झाल्यानंतर गावकऱ्यांनी हायकोर्ट तसेच बिलोली तहसील प्रशासनाचे आभार व्यक्त करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी नायब तहसीलदार बालाजी मिठेवाड यांच्या हस्ते श्रीफळ फोडून रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बालाजी मिठेवाड यांनी रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असल्यास गौण खनिज वापराबाबत शासनाची आवश्यक परवानगी घेऊनच पुढील काम करण्यात यावे, अशा सूचना दिल्या. गावकऱ्यांनी हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला असून, संबंधित विकासकामे शासनाच्या नियमानुसार पूर्ण करण्यात येणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## सुनेत्रा पवार यांच्यावरील टीकेवर मंत्री सामंत यांचा निषेध

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी नांदेड दौऱ्यात विविध राजकीय आणि औद्योगिक विषयांवर सविस्तर भूमिका मांडली. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावरील काँग्रेसच्या सोशल मीडिया पोस्टवर तीव्र आक्षेप घेतला. त्याचबरोबर शिवसेना पक्ष व चिन्हासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी, कथित ऑडिओ क्लिप प्रकरण, पंकजा मुंडे यांच्याबाबतची चर्चा आणि नांदेडमध्ये प्रस्तावित हेलिप्लांट या विषयांवरही त्यांनी भाष्य केले.



राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसने केलेल्या सोशल मीडिया पोस्टचा निषेध करताना सामंत म्हणाले, काँग्रेसच्या या भूमिकेतून महिलांविषयीचा त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पश्चात राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सक्षमपणे काम करत आहेत. अशा नेतृत्वावर वैयक्तिक टीका करणे योग्य नाही. येणाऱ्या निवडणुकांमध्ये राज्यातील महिला काँग्रेसला याचे उत्तर देतील. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीबाबत बोलताना सामंत म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उठावासंदर्भातील सर्व आवश्यक कागदपत्रे न्यायालयात सादर करण्यात येतील. पक्षाचे विधिज्ञ सक्षमपणे युक्तिवाद करतील आणि सर्वोच्च न्यायालयाकडून न्याय मिळेल, असा विश्वास आहे.

चौधरी प्रकरणावर त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची पोलीस चौकशी व्हावी अशी मागणी केली. ही ऑडिओ क्लिप कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाद्वारे तयार करण्यात आली असल्याचा दावा आहे. सत्य समोर येण्यासाठी पोलीस तपास आवश्यक आहे. जर ही क्लिप खोटी ठरली तर बदनामी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. मात्र क्लिप खरी असेल तर त्याबाबतही सत्य जनतेसमोर आले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पंकजा मुंडे या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री व्हाव्यात, या केलेल्या वक्तव्यावर सामंत म्हणाले, मुंडे या भाजपच्या सक्षम नेत्या आहेत. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या सामाजिक आणि राजकीय वारशाचे त्या प्रभावीपणे नेतृत्व करत आहेत. महाराष्ट्राला त्यांच्या नेतृत्वाची गरज आहे. मात्र त्यांना मुख्यमंत्री करायचे की नाही, हा निर्णय पूर्णपणे भारतीय जनता पक्षाचा अंतर्गत विषय आहे.

मंत्री संजय शिरसाट, आ. बच्चू कडू आणि अभिजीत दीपके यांच्या भेटीबाबत विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून हा विषय चर्चेत होता. मात्र आता तो संपला आहे. मी नांदेडमध्ये विकासकामांचा आढावा घेण्यासाठी आणि पक्षाच्या संघटनात्मक कामांसाठी, विशेषतः बीएलए (बुथ लेवल एजंट) यंत्रणेचा आढावा घेण्यासाठी आलो आहे.

### नांदेडमध्ये हेलिप्लांट प्रस्तावित

पत्रकारांशी बोलताना सामंत यांनी नांदेडमध्ये 'हेलिप्लांट' उभारण्यासाठी एका कंपनीसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती दिली. यामुळे जिल्ह्यात रोजगार आणि औद्योगिक विकासाला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शंभर टक्के 'एसआयआर' पुनर्निरीक्षण करणाऱ्या 'बीएलओं'चा सत्कार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड दक्षिण भागातील शंभर टक्के काम करणाऱ्या बीएलओ यांचा सत्कार ईआरओ अविनाश शिनगारे यांच्या हस्ते ५ ऑगस्ट रोजी मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयात करण्यात आला.



२९ जून ते ३० जुलैपर्यंत एसआयआरचे घरोघरी प्रत्यक्ष मतदारांना भेटी देऊन ईएफ फॉर्म भरून घेण्याचे काम शंभर टक्के करणारे बीएलओ यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक गोविंद क्षीरसागर यांचा तर संदीप शिंदे, संजय साखरे, गोविंद जाधव, मुरलीधर शिंदे, चंद्रकांत मोरे, स्वप्नील पातळे, मोरे, प्रकाश दर्शने, संघपाल कांबळे, विक्रमसिंह बैस यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाला पर्यवेक्षक साहेबराव देवरे व अंगद जाधव यांची तर सहायक ईआरओ श्रीनिवास म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन गोविंद क्षीरसागर यांनी केले तर आभार संतोष स्वामी यांनी मानले.

## दर्जेदार नाट्यप्रयोगांनी गाजला स्वप्नरंग नाट्य महोत्सव

**नांदेड (प्रतिनिधी)**– संस्कृती मंत्रालय, भारत सरकार, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका आणि स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय स्वप्नरंग नाट्य महोत्सवाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. मुंबई, पुणे, परभणी, लातूर आणि नांदेड येथील नामांकित नाट्यसंस्था व कलाकारांनी दर्जेदार नाट्यप्रयोग सादर करत नाट्यरसिकांची मने जिंकली.

महोत्सवात विविध आशयघन नाटके, दीर्घांक, एकांकिका आणि एकपात्री प्रयोगांचे प्रभावी सादरीकरण झाले. प्रत्येक प्रयोगाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांच्या अभिनयाला भरभरून दाद दिली. तीन दिवस रंगलेल्या या महोत्सवामुळे नांदेडमधील नाट्यप्रेमींना वैविध्यपूर्ण रंगकृतींचा दर्जेदार आस्वाद घेण्याची संधी मिळाली.



महोत्सवाच्या निमित्ताने राज्यातील विविध भागांतील लेखक, दिग्दर्शक, कलाकार आणि नाट्यसंस्था एकाच व्यासपीठावर आल्या. त्यामुळे परस्पर संवाद, अनुभवांची देवाणघेवाण आणि नव्या कलात्मक संकल्पनांना चालना मिळाली. अशा उपक्रमांमुळे मराठी नाट्य चळवळीला बळ मिळण्यासोबतच सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध होत असल्याची भावना उपस्थित रंगकर्मी आणि नाट्यरसिकांनी व्यक्त केली.

नाट्य महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्कृती मंत्रालय, भारत सरकार तसेच नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महोत्सव समन्वयक सुधांशू सामलेट्टी यांच्यासह गौतम गायकवाड, शांती देसाई, किरण टाकळे, संदेश महाबळे, नागेश डोईबळे, स्वरा देशमुख आणि मुरलीधर हंबर्डे यांनी विशेष परिश्रम घेतले.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी सहभागी नाट्यसंस्था, कलाकार, स्वयंसेवक, प्रसारमाध्यमे आणि नाट्यरसिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष दिनेश कवडे यांनी सर्वांचे आभार मानले.

## नरसी ग्रामपंचायत कार्यालयात शौचालयाचा अभाव; महिला, ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –केंद्र व राज्य शासनाकडून ग्रामीण भागात स्वच्छता आणि शौचालय उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात असताना नायगाव तालुक्यातील सर्वात मोठ्या १७ सदस्यांच्या नरसी ग्रामपंचायत कार्यालयातच शौचालयाची सुविधा नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे विविध कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.




नरसी ग्रामपंचायत कार्यालयात जन्म-मृत्यू दाखले, विविध प्रमाणपत्रे, करभरणा, शासकीय योजनांबाबतची माहिती व इतर कामांसाठी दररोज सुमारे ४०० ते ५०० नागरिकांची वर्दळ असते. मात्र, कार्यालयात शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व दिव्यांगांची मोठी अडचण होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

नरसी व कुंटूर या दोन्ही ग्रामपंचायतींचा कारभार एकाच ग्रामविकास अधिकाऱ्याकडे असल्याने नागरिकांना अनेकदा तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. या कालावधीत शौचालयासारखी मूलभूत सुविधा नसल्याने नागरिकांचा त्रास अधिक वाढत आहे. ग्रामपंचायत कार्यालयात पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि बसण्याची व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा असणे आवश्यक असल्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात तातडीने स्वतंत्र व सुसज्ज शौचालयाची उभारणी करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित प्रशासनाकडे नागरिकांनी केली आहे.

## लिंबगाव व तामसा ठाण्याच्या हद्दीत फसवणुकीच्या घटना

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील लिंबगाव आणि तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत फसवणुकीच्या दोन घटना उघडकीस आल्या असून, या दोन्ही प्रकरणांत सुमारे ७ लाख ८७ हजार ९५८ रुपयांची फसवणूक झाल्याची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

हदगाव तालुक्यातील तामसा येथील प्रकरणात ३ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत पीयूष सोमानी, रवी कपूर, दिशा अग्रवाल, रिचा मिश्रा, गीता बॅनर्जी व अंकिता राणे (सर्व रा. तामसा) यांनी संगनमत करून फिर्यादीला एसबीआय पॉलिसी बंद करणे, रक्कम परत मिळवून देणे, कस्टमर आयडी, इन्शुरन्स खाते सुरू करणे तसेच सर्व्हिस टॅक्स भरणे आदी कारणे सांगून ५ लाख ३६ हजार ४३८ रुपये भरायला लावले. मात्र, कोणतीही रक्कम परत न देता आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शिवाजीनगर, तामसा येथील मोनिका राजेंद्रसिंह कच्छवेठेकर (वय २६) यांच्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक वसंत सरपे करीत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत साई श्रद्धा हिंदुस्थान पेट्रोल पंप, सुगाव (बु.) येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी २०० लिटर पेट्रोल व २०० लिटर डिझेल, असा एकूण २ लाख ५१ हजार ५२० रुपयांचा अपहार करून फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी हिरालाल शर्मा, शिवराज स्वामी व परमेश्वर (रा. वाघी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी श्रद्धा दीपकसिंह रावत (वय ४७, रा. गाडीपुरा, नांदेड) यांच्या तक्रारीवरून लिंबगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ बोधनकर तपास करीत आहेत.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार सोहळा संपन्न; २१ गुणवंतांचा सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)** – साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी नांदेड येथील डॉ. अण्णाभाऊ साठे चौक येथे 'डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार सोहळा -२०२६' अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. लहुजी साळवे युवक संघ, नांदेड व साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय आणि कला अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



या कार्यक्रमास नगरसेविका डॉ. मंजुषाताई रानवळकर, नगरसेविका सौ. प्रियंकाताई कांबळे आणि नगरसेवक प्रतिनिधी महेंद्र देमगुंडे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच विशेष अतिथी म्हणून समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे, भारत दाढेल, पंडित वाघमारे आणि अविनाश पाईकराव आदी उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. 'शोध नावीन्याचा, सन्मान कार्याचा' पुरस्काराचे मानकरी, समाजातील विविध स्तरांवर उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना 'डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार - २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. **महिला मानकरी:** डॉ. विजया दाढेल, द्रौपदीबाई कांबळे, डॉ. अनिता कांडलीकर, रेणुका गुप्ता, मीनाताई आरसे, रूचिरा बेटकर, **सामाजिक व इतर क्षेत्रांतील मानकरी:** ज्ञानदीप आंदे, ॲड. यदुपत अर्धापूरकर, जळबाजी गायकवाड, रमेश गोपले, बापुराव मोरे, आनंद टोमके, सुनिल जाधव, अंतेश्वर तलवारे, बालाप्रसाद भालेराव, गोविंद मरशिवणीकर, कैलास खानजोडे, दत्तप्रसाद तालीमकर, महेंद्र तलवारे, विनोद पाचंगे, साहेबराव झुंजारे यांचा गौरव करण्यात आला.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी आयोजक संजय गायकवाड, संयोजक सोनू दरेगावकर, उमाजी रेड्डी, अंगद भालेराव, शिवाजी रेड्डी, लहुदास भालेराव, दत्ता गायकवाड, साहेबराव वाघमारे, संदीप गायकवाड, रवी राऊतखेडेकर, अंकुश गायकवाड, प्रशांत देटवे व नागेश गोरठकर यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यास नांदेड शहरातील नागरिक, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी पुरस्कारप्राप्त सर्व मान्यवरांचे अभिनंदन केले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भगवान सूर्यवंशी यांनी केले तर सूत्रसंचालन संयोजक सोनू दरेगावकर यांनी केले. शेवटी ॲड. प्रसाद रानवळकर यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com